


WWJMRD 2019; 5(12): 76-77
www.wwjmrd.com
*International Journal*
*Peer Reviewed Journal*
*Refereed Journal*
*Indexed Journal*
*Impact Factor MJIF: 4.25*
E-ISSN: 2454-6615

**विश्वास गोरखनाथ वळवी**
(संशोधक विद्यार्थी)
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
जळगाव (महाराष्ट्र)

**Correspondence:**
**विश्वास गोरखनाथ वळवी**
(संशोधक विद्यार्थी)
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
जळगाव (महाराष्ट्र)

# ''ख्रिस्ती साहित्य आणि वाचकवर्गाची उदासीनता:- एक चिकित्सा''

**विश्वास गोरखनाथ वळवी**

**Abstract**
Christian literature is giving way to various Christian doctrines. For example, faith, hope, love. Many literatures have been written in the world on the above topics of Christian literature. Therefore, there are many good things on which Christian literature is based. As much as Christian literature is based on faith, hope and love, it is also based on pure command, pure fear, and God's judgment of truth. Only then will it be called Christian literature in the true sense. The basis and theme of Christian literature should be only God and His work. Kingdom-preaching work would accelerate, and to a lesser extent, through Christian literature, in the last century.

**Keywords:** God, Christian, Commandments, Jehovah, Holy Spirit, Knowledge, Moses, Faith, Judgments, Fear

**प्रस्तावना:**
ख्रिस्ती साहित्य आणि वाचकवर्गाची उदासीनता:-आज ख्रिस्ती साहित्य जरी अंशतः निर्माण झालेले असले तरी ख्रिस्ती समाजात वाचक वर्ग त्याहूनही खूपच कमी आहे.त्यांच्या प्रतिसाद कोणत्याही ख्रिस्ती पुस्तकाबद्धल नगण्यच असतो.असे का बरे? मंडळींचा इतिहास आणि मिशनरी चळवळ देखील हे लोक वाचत नाही.पण याला कारणीभूत फक्त वाचकवर्ग नसून काही प्रमाणात ख्रिस्ती प्रकाशनसंस्था आणि साहित्यिकही आहे.

**१) मिशनऱ्यांचे साहित्य पुनर्मुद्रित झालेले नाही:-**
गेल्या दोनशे वर्षात भारतात अनेक ख्रिस्ती मिशनरी येऊन गेले.त्यांनी स्थानिक लोकांसाठी मोठ्या प्रमाणात ख्रिस्ती साहित्य निर्माण केले.पण सध्यस्थीतीत ते साहित्य दोन टक्केचे पुनर्मुद्रित झालेले दिसून येते.ख्रिस्ती साहित्यिक आणि प्रकाशनसंस्था यांनी ते पूर्णपणे प्रकाशित केलेले नाही.बॉम्बे बुक अँड ट्रॅक्ट सोसायटी यांनी हजारो पुस्तके छापली पण ती जतन करण्यात ते निष्फळ गेले.जे साहित्य उरले ते काही चर्चसंस्थांनी जाळून टाकले,तर काहींनी ते फेकून दिले,विकून दिले,काही ख्रिस्ती लोकांकडे ते साहित्य आहे पण ते दुसऱ्यांना द्यायला तयार नाही.अशा अनेक कारणांमुळे मिशनरी ख्रिस्ती साहित्याच्या संपूर्ण इतिहास काळाचा ओघात गुरमळत आहे.

**२) ख्रिस्ती साहित्यिकांची इतिहासाप्रति उदासीनता:-**
आधुनिक ख्रिस्ती साहित्यिकांनी नवीन साहित्य निर्मिती केली पण ते देखील नगण्य स्वरूपात अडकून राहिले.मराठी ख्रिस्ती साहित्यिक काव्यमय भाषेपलीकडे पाहायला तयार न झाल्यामुळे मिशनरी चळवळीचा इतिहास दुर्लक्षित राहिला.मराठी भाषिक साहित्यिकांनी हे समजायला हवे की मिशनरी चळवळीचा इतिहास हा इतिहासात दडलेला आहे.त्यामुळे संपूर्ण भारतीय मिशनरी चळवळीत,मिशनरी आणि त्यांचे वैयक्तिक जीवन,त्यांचे साहित्य,त्याच्या सुवार्ता प्रचार,त्यांची दिनचर्या,त्यांनी केलेल्या सामाजिक सुधारणा,आर्थिक व्यवहार,त्यांनी स्थापिलेल्या मंडळींची संख्या इत्यादी अनेक विषय हे मराठी ख्रिस्ती साहित्यिकांनी दुर्लक्षित केल्यामुळे ख्रिस्ती साहित्याला न्याय मिळाला नाही.

**३) ख्रिस्ती समाजाला अजूनही ख्रिस्ती साहित्याप्रति आपुलकी निर्माण झाली नाही:-**
हे खरे आहे.मी भरपूर ख्रिस्ती लोकांना सल्ला देतो की तुम्ही ख्रिस्ती साहित्य वाचा.?त्यांचे उत्तर असते

आमच्याकडे पवित्रशास्त्र आहे.या लोकांचे अज्ञान म्हणजे यांचा आत्मिक भोळेपणा होय.त्यापलीकडे यांना काहीही सुचत नाही.सेंट ऑगस्टिन.मार्टिन ल्युथर,जॉन बनियान,स.ना.सूर्यवंशी,पंडिता रमाबाई.ना.वा.टिळक.यांनी कशाला ख्रिस्ती साहित्य लिहिले असणार.? ते सोडा अशिक्षित असलेल्या लक्ष्मीबाई टिळकांनी स्मृतीचित्र का लिहिली.? ख्रिस्ती समाजातील लोकांना मी आव्हान करतो.ख्रिस्ती साहित्याप्रति आपली आपुलकी निर्माण करा.ख्रिस्ती साहित्य लिहिणारे देखील ख्रिस्तीच आहे,पवित्रशास्त्र आणि पवित्र आत्मा त्यांच्या मार्गदर्शक आहे.आपली उदासीनता बाजूला ठेवा आणि मिशनरी चळवळ आणि मंडळीचा इतिहास वाचून आप-आपल्या सेवेचे इप्सित साधून घ्या.

**४) नवीन ख्रिस्ती साहित्यिकांना शून्यमंच:-**

महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण भारतीय ख्रिस्ती समाजात ही परिस्थिती आहे.एखादा ख्रिस्ती तरुण अथवा तरुणींमध्ये साहित्यिकदृष्टी असूनही ती काळाचा ओघात नाहीशी होते.कारण त्यांच्यासाठी ख्रिस्ती साहित्यिकांनी मंचच उपलब्द करून दिलेले नाही.आणि जेथे उपलब्ध करून दिले जाते ते नगण्य स्वरूपात असते.त्यात ना आर्थिक साहाय्य ना पाठबळ असते,फक्त ते मौखिकदृष्ट्या दिले जाते.

**५) प्रकाशनसंस्थाची गळती:-**

ऑपरेशन मोबालाइजेशन (*OM*) सोडली तर ख्रिस्ती साहित्याची कोणतीही प्रकाशन संस्था पुस्तकांचे लिखित साहित्य निर्माण करणे,त्याच्या प्रचार करणे,त्याचे जागतिक दर्जाचे वितरण करणे इत्यादी कार्य करू शकलेली नाही.ख्रिस्ती साहित्य पहिलेचे नगण्य स्वरूपात प्रकाशित केले जाते,आणि पुढे त्याचे वितरण होत नाही.ओएम प्रमाणे लोकांमध्ये वाचनाचा छंद इतर ख्रिस्ती प्रकाशन संस्थेनी निर्माण केला नाही,त्यामुळे ख्रिस्ती पुस्तकांचा खप आणि प्रचार होत नाही.

**६) ख्रिस्ती साहित्य विनामूल्य दिल्याने.त्याचे महत्व कमी झालेले दिसून येते:-**

सध्या ख्रिस्ती समाजात सेवेचा नावावर लोकांमध्ये ख्रिस्ती साहित्याचे वाटप हे फुकट केले जाते.जेणेकरून जास्तीत-जात ख्रिस्ती लोकांनी ते वाचावे आणि त्यातून प्रेरणा घेऊन ख्रिस्ताचे राज्य वाढवावे.हे एक प्रकारे चांगलेच आहे.पण ख्रिस्ती साहित्य विनामूल्य वाटल्याने उलटा परिणाम दिसून येत आहे.ख्रिस्ती लोकांचा घरी हे साहित्य धूळ खात पडून असते,लोकांना मिशनरी कोण हेच माहीत नाही,मंडळींचा इतिहास माहीत नाही,पवित्रशास्त्रच काही ख्रिस्ती लोक जेमतेम वाचतात तर इतर ख्रिस्ती साहित्याची गोष्ट सोडाच.ख्रिस्ती साहित्य आणि त्याच्या गोडवा निर्माण करण्यासाठी ख्रिस्ती साहित्यिक आणि ख्रिस्ती प्रकाशन संस्था यांनीही आता पुढे येऊन पुढाकार घेण्याची वेळ आलेली आहे.जेणेकरून ख्रिस्ती साहित्याच्या माध्यमातून ख्रिस्ती लोकांनी स्वतःमध्ये आणि इतर समाजात आध्यात्मिक प्रबोधन घडवून आणावे.

**संदर्भसूची:-**


1. सेक्युलरीझम, प्रबोधनाचा मानदंड, डॉ.श्रीपाल सबनीस, सुगावा प्रकाशन, प्रथमावृत्ती, १९९६.
2. *www.vishwakosh.marathi.gov.in Date 15/11/2018, Time 11.13 AM*
3. पाश्चिमात्य तत्वज्ञानाची कहाणी, साने गुरुजी वरदा प्रकाशन, प्रथमावृत्ती, पुणे, २०११.
4. विश्वासनाऱ्यासाठी पवित्रशास्त्र टीकासंग्रह, विल्यम मकडोनाल्ड, जी.एस.बुक्स, प्रथमावृत्ती, २०१७.